## जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे

**रद्दी निविदा सूचना**

मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, पुणे यांच्या आदेशावरून आपणांस असे कळविण्यात येते की, न्यायालयीन, जुन्या फाटक्या अभिलेख्यांची (रेकॉर्ड) रद्दी जिल्हा न्यायालय, पुणे या कार्यालयाकडे तसेच पुणे जिल्हयातील तालुका न्यायालयांकडे उपलब्ध आहे. सदरची रद्दी विकत घेण्यासाठी या सूचनेद्वारे निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदाधारकाने रद्दी विकत घेण्यासाठी प्रति १०० किलो दराच्या सीलबंद निविदा या कार्यालयाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. सदरची रद्दी आपण आपल्या खर्चाने जिल्हा न्यायालय, पुणे तसेच पुणे जिल्हयातील सर्व तालुका न्यायालयातून आपली निविदा मंजूर झाल्यानंतर अटी व शर्ती प्रमाणे न्यावयाची आहे. सदरच्या निविदेच्या पाकिटावर **"रद्दी खरेदी निविदा"** असे ठळक अक्षरांत नमूद करावे.

सदरची रद्दी जशी आहे तशा स्वरुपात आपणांस स्वीकारावी लागेल. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणत्याही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना राहील.

## <u>अटी व शर्ती</u>

१. निविदाधारकांनी आपली निविदा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश, यांच्या नावे या कार्यालयाकडे दिनांक १६/०४/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, पुणे यांचेकडे अनामत रकमेसह सीलबंद पाकीटात जमा करावी. तसेच आलेल्या सर्व निविदा दिनांक १८/०४/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता जिल्हा न्यायाधीश – ५, पुणे यांचे न्यायालयीन कक्षात सर्वासमक्ष उघडणेत येतील.

२. सदर रद्दी खरेदीबाबत निविदा सादर करणा–यास अनामत रोख रक्कम रुपये १५,०००/– (रुपये पंधरा हजार) नाझर, जिल्हा न्यायालय, पुणे या कार्यालयात जमा करुन रीतसर पावती घ्यावी लागेल. सदरची अनामत रक्कम भरणा न केल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

३. ज्यांची निविदा मंजूर करण्यात येईल त्यांनी सदरची रद्दी निविदा मंजूर झाल्यानंतर जिल्हा न्यायालय सोबत करारनामा करावा लागेल. जिल्हा न्यायालय आवारातील रद्दी आठ दिवसांत व तालुका न्यायालयातील रद्दी वीस दिवसांत खरेदी करावयाची आहे. तसेच पुढे वर्षभर जशी रद्दी साचेल त्याप्रमाणे रद्दी जेथे असेल तेथून स्वखर्चाने ठरलेल्या दराने न्यावयाची आहे. अन्यथा भरलेली अनामत रक्कम सरकारजमा करण्यात येईल.

४. तसेच रद्दी करीता आवश्यक असलेली पोती व कामगार वर्ग व वाहतूक खर्च निविदाधारकाने करावयाचा आहे.

५. सदर निविदेबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास तो दिवाणी न्यायालय, पुणे न्याय क्षेत्राच्या अधिकार कक्षेत राहील.

६. ज्याची निविदा मंजूर केली जाईल त्याने जिल्हा न्यायालयातील रद्दीचे वजन केल्यावर निविदेतील तरतुदीप्रमाणे रद्दीची अंदाजित आगाऊ रक्कम भरावी व वजन झाल्यावर सर्व रक्कम त्वरीत नाझर, जिल्हा न्यायालय, पुणे यांच्याकडे जमा करावी लागेल. तसेच तालुका न्यायालयातील रद्दीचे वजन केल्यावर रद्दीची सर्व रक्कम त्वरीत तालुका न्यायालयात असेलेले नाझर यांच्याकडे जमा करावी लागेल. त्याबद्दल त्यांना अलाहिदा पावती देण्यात येईल.

७. प्राप्त झालेल्या सर्व निविदा कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना राखून ठेवला आहे.

८. ज्याची निविदा स्वीकारण्यात येईल त्यास रद्दीचे वजन शासनमान्य वजन काटयावर वजन करुन त्याचे खर्चाने घ्यावे लागेल. तसेच तालुक्याच्या ठिकाणी शासनमान्य वजन काटा नसल्यास निविदाधारकास रद्दीचे वजन करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वजनकाटा स्वत: आणावा लागेल.

सदरची नोटीस दि. ११/०३/२०२४ रोजी मी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

हुकूमावरुन,

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, पुणे

जा.क्र.
दिनांक : ११/०३/२०२४